# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# सर्वांनी मिळून कवी यशवंतांचे स्मारक समृध्द करूयात : विक्रमसिंह पाटणकर

▲ **पाटण**, दि. १८ : महाराष्ट्र कवी यशवंत यांचे चाफळ गावी स्मारक झाले आहे. यापुढे कवींची सर्व पुस्तके, वस्तू, छायाचित्रे व त्यांच्या आठवणी एकत्र करून हे स्मारक अधिक समृद्ध होईल, असा प्रयत्न आपण सर्वांनी मिळून करूया, असे आवाहन माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

महाराष्ट्र कवी यशवंत यांच्या जयंतीदिनी या स्मारकात त्यांचे तैलचित्र तसेच त्यांच्या दोन कवितांची संगमरवरातील काव्यशिल्पे यांचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र कवी यशवंत प्रतिष्ठान, चाफळ व बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, मराठी विभाग व साहित्य परिषद, शाखा पाटण यांनी संयुक्तपणे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. साहित्य परिषदेचे नूतन अध्यक्ष अमरसिंह पाटणकर यांच्या प्रेरणेतून स्मारक समृद्ध करण्यासाठी वरील बाबी प्रमाणेच कवींच्या पुस्तकांची मुखपृष्ठे, काव्यसंपदा, जीवनपट प्रदर्शित करण्यात आला असून यामुळे हे स्मारक एक आकर्षण स्थळ ठरणार आहे. स्मारक भाविक व पर्यटकांसाठी प्रेक्षणीय स्थान व्हावे यासाठी यापुढेही प्रयत्न सुरु ठेवणार असल्याचे अमरसिंह पाटणकर यांनी स्पष्ट केले.



अनावरणप्रसंगी **विक्रमसिंह पाटणकर, समवेत अमरसिंह पाटणकर, विनोद कुलकर्णी, शिरीष पवार व मान्यवर.**

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सुरेल गीते सादर करत कार्यक्रमाची रंगत वाढविली. शिक्षक वसंत जाधव यांनी आई ही कविता गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. प्रतिष्ठानचे कार्यवाह संभाजीराव देशमुख, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, सांगली नगरवाचनालयाचे अध्यक्ष श्रीकांत जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास पेंढरकर कुटुंबीय, प्रतिष्ठानचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.